I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S. (पोलीस ठाणे):** गोरेगांव **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0614 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/11/2025 21:13 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 27/10/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 27/10/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 14:34 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:01 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 04/11/2025 **Time (वेळ):** 08:30 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 044 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 04/11/2025 21:13 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 02 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** गोरेगाव,गोरेगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सरतर्फे उमाकांत गोवर्धन उगले

(b) **Father's Name (चे नाव ):** गोवर्धन उगले

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1973

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक लाप्रविगोंदिया, गोंदिया, गोरेगांव, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक लाप्रविगोंदिया, गोंदिया, गोरेगांव, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9664959090

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरविंदकुमार युवराज डहाट | | वडील चे नाव : युवराज डहाट | 1. Town/Village (शहर / गाव): कुंभारे नगर,नाना चैक समोर,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): गोरेगांव,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ओडियो कॅसेट | दोन 32 GB क्षमतेचे सॅनडिक्स कंपनीचे मेमरी कार्ड | .00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | एक रियल मी कंपनीचा मोबाईल फोन | 5,000.00 |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 5,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

फिर्याद

लाचलुचपत प्रबिंधक विभाग गोंदिया
दिनांकः- 04.11.2025

मी उमाकांत गोवर्धन उगले, वय 50 वर्ष, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया मो. क्र. 9664959090 शासनातर्फे फिर्याद देतो कि, दिनांक 27.10.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया कार्यालयात दैनंदिन कामे करीत हजर असतांना वेळ 10.30 वाजता तक्रारदार श्री. मेघनाथ पुनाराम लांजेवार वय 36 वर्ष, व्यवसाय-लॉन चालविणे, रा. वार्ड क्र. 02, ठाणा रोड गोरेगांव, ता.गोरेगांव, जि.गोंदिया हे एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार देण्याकरीता आल्याने त्यांची तक्रार ऐकुण त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगीतले. त्यावरुन त्यांनी नोंदविलेली तक्रार पुढील प्रमाणे आहे.

"मी सविनय विनंती अर्ज सादर करतो कि, वरील नमुद पत्यावर आपले कुटुंबासह राहत असुन बि.व्ही. मॅरेज लॉन या नावाने गोरेगांव येथे लॉन चालवितो.

ऑगस्ट 2025 मध्ये माझ्या नावावर असलेला गोरेगांव येथील गट क्र. 1004/4 मधील पडीत जमीन पैकी 305.50 चै.मि. प्लॉटचा अकृषीक विकासात्मक परवानगी मिळण्याकरीता मा. मुख्याधिकारी नगर पंचायत गोरेगांव येथे केला असुन, मुख्याधिकारी नगर पंचायत गोरेगांव यांनी दिनांक 21.08.2025 रोजी तहसिलदार गोरेगांव यांना अकृषीक आकारणी व उपकर भरण्याकरीता पत्र दिले होते. तहसिलदार गोरेगांव यांनी ग्राम महसुल अधिकारी श्री. डहाट साझा क्र. 08 यांना माझ्या प्लॉटची मौका चैकषी करुन मुद्देनिहाय अहवाल तातडीने सादर करण्यासाठी दिनांक 15.09.2025 रोजी पत्र दिले आहे. मी तहसिल कार्यालय गोरेगांव येथे जावुन याबाबत सहानिषा केली असता माझ्या प्लॉटची मौका चैकषी करण्यासाठी ग्राम महसुल अधिकारी श्री. डहाट साझा क्र. 8 गोरेगांव यांना पत्र दिले आहे. त्यांच्या कडुन मौका चैकषी अहवाल आल्यावर तुमच्या प्लॉटची अकृषीक विकासात्मक परवानगी देण्यात येईल असे कळाले. तेव्हा मी माझे काम लवकर व्हावे म्हणुन दिनांक 23.09.2025 रोजी ग्राम महसुल अधिकारी श्री. डहाट यांना जावुन भेटलो असता त्यांनी दिनांक 24.09.2025 रोजी तुमचे प्लॉटवर येवुन मौका चैकषी करुन अहवाल देतो असे सांगीतले. त्याप्रमाणे ग्राम महसुल अधिकारी श्री डहाट हे दिनांक 24.09.2025 रोजी माझे प्लॉटवर आले मौका चैकषी केली व मला म्हणाले, मौका चैकषी करुन अहवाल तहसिल कार्यालय येथे लवकर पाठवुन देण्यासाठी 15,000/-रुपये दयावे लागतील. तेव्हा त्यांना मी माझेकडे आता पैसे नसल्याचे सांगुन त्यांना पैसे दिले नाही. ग्राम महसुल अधिकारी श्री डहाट हे मौका चैकषी करुन प्लॉटवरुन निघुन गेले.

दिनांक 24.10.2025 रोजी मी माझे लॉनवर असतांना ग्राम महसुल अधिकारी श्री डहाट साहेब आले व मला म्हणाले, 15000/-रुपये दिल्याषिवाय तुमचे प्लॉटचा मौका चैकषी अहवाल पुढे पाठवणार नाही, तेव्हा मी त्यांना ठिक आहे साहेब पैसे जमल्यास आपणास भेटतो असे सांगीतले. गै.अ. ग्राम महसुल अधिकारी श्री डहाट यांनी माझे प्लॉटचे मौका चैकषी करुन अहवाल देण्यासाठी मांगीतलेले 15,000/-रुपये हि शासकिय फिस नसुन स्वतः करीता मागत असल्याने व त्यांना हि लाच

रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरुध्द तक्रार देत आहे. त्यांचेसोबत माझे आर्थिक व्यवहार तसेच जुने वैमन्यषः नाही. तरी त्यांच्या विरुध्द कारवाई होण्यास विंनती आहे. मी माझ्या प्लॉट संबंधीत कागदपत्रे सोबत देत आहे.“

तक्रारदार श्री मेघनाथ पुनाराम लांजेवार यांची वरील प्रमाणे तक्रार नोंदवुन घेतल्यानंतर सापळा कार्यवाही करण्यासाठी शासकीय कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत आमचे अधिनस्त अंमलदार यांच्या हस्ते मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक 1121/2025 दि. 27.10.2025 अन्वये दिले असता त्यांनी त्यांचे कार्यालयीन डिजीटल पत्र क्रमांक. I/1816432/2025 दि.27.10.2025 अन्वये श्री. प्रविण शिरीषकुमार राहांगडाले वय-32 वर्ष, पद- कनिष्ठ सहायक, कृषि विभाग, जिल्हा परिषद गोंदिया रा.मु.पो.तांडा ता.जि.गोंदिया व श्री. गणेष योगराज गौतम वय -49 वर्ष, पद- कनिष्ठ सहायक, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद गोंदिया रा. मु.सर्वाटोला, पो.मोहगाव (बु) ता.गोरेगाव जि.गोंदिया यांना नापोषि.अषोक कापसे यांचेसह या कार्यालयात पाठविले. सापळा कार्यवाही दोन्ही पंचाची पंच म्हणुन काम करण्याची संमती घेण्यात आली त्यानंतर श्री. प्रविण षिरीषकुमार राहांगडाले यांना पंच क्र. 1 तर श्री. गणेष योगराज गौतम यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमण्यात आले.

सापळा पार्टीतील सदस्य स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा. संजयकुमार बोहरे, पो.हवा. मंगेष काहालकर, नापोषि. संतोष शेंडे, अषोक कापसे, संतोष बोपचे, प्रषांत सोनवाने, कैलाष काटकर, मनापोशि संगीता पटले, चानापोशि दिपक बाटबर्वे सर्व ला.प्र.वि. कार्यालय गोंदिया तसेच तक्रारदार मेघनाथ पुनाराम लांजेवार यांचा नमुद दोन्ही पंचांषी परिचय करून देवून यांचीच एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे पंचांना सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांना लाचेमध्ये देण्याकरीता रू. 15,000/- हजर करण्यास सांगितले. त्यावरून त्यांनी स्वतःच्या बचतीतुन त्यांच्याकडे जमा असलेल्या रू. 500/- दराचे 30 चलनी नोटा असे एकुण रू. 15,000/- हजर केले. त्या नोटांचे क्रमांक पंच क्र. 1 यांनी वाचले व पंच क्र. 2 यांनी पडताळुन पाहिले. त्या चलनी नोटांची वेगळी विस्तृत यादी तयार करण्यात आली.

तक्रारदार व दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणाऱ्या अँथ्रॉसीन पावडर, अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग व त्यांचे वैशिष्टे तसेच व्हाईस रेकार्डर बाबत समजावून सांगुण प्रात्याक्षीक करुन दाखविले. त्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदाराने लाच म्हणून द्यावयासाठी हजर केलेल्या रू. 500/- दराचे 30 चलनी नोटांना आमचे अधिनस्त अंमलदार यांचे हस्ते दोन्ही बाजुने अँथ्रॉसीन पावडर लावुन त्या नोटा एका कागदी लिफाफ्यात टाकुन त्या लिफाफ्यावर पंच व आमचे सहीचे कागदी लेबल लावुन पंचासमक्ष सिलबंद करुन तो लिफाफा ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन दिला.

तक्रारदार यांनी नोंदविलेल्या तक्रारीनुसार गैरअर्जदार डहाट यांचेविरुध्द लाच मागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात होणारे संभाषण व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करणे असल्याने आमचे सुचनेवरुन अधिनस्त अंमलदार यांनी कार्यालयात

असलेले ”सोनी“ कंपनीचे ICD-PX470 डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये प्लॉस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. MMC16AX215FT4-CC JX XAH 2412 असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचाना खात्री करुन देवुन सदर व्हाईस रेकार्डर बंद करुन सुस्थितीत सापळा बॅगमध्ये ठेवण्यात आले.

त्यानंतर गै.अ.यांचे विरुध्दची लाच माणगी पडताळणी कार्यवाही त्याच दिवषी दिनांक 27.10.2025 रोजी तलाठी कार्यालय गोरेगाव येथे जावुन करण्याचे सर्वानुमते ठरवुन लाच मागणी पडताळणी कार्यवाहीदरम्यान घ्याव्याच्या दक्षतेबाबत पंच व तक्रारदार यांना सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन अधिनस्त अंमलदार यांनी ट्रॅप सुटकेसमधुन सुस्थितीत करुन ठेवुन असलेले सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस बाहेर काढले व वेळ 14.34 वाजता सुरु करुन ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले. वेळ 14.34 वा. ते 14.57 वा. व 14.58 ते 15.22 वा. दरम्यान गै.अ.यांची तक्रारदार यांचेकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी तलाठी कार्यालय गोरेगाव येथे तसेच तक्रारदार यांचे व्ही.बी.लॉन मध्ये पंच क्र 1 यांचे समक्ष कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे करण्यात आली. तक्रारदार व गैरअर्जदार यांचेतील लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 251027_1434.mp3 व फाईल 251027_1458.mp3 मध्ये रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले. लाच मागणी पडताळणी कार्यवाहीदरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरच्या व्हॉईस रेकॉर्डर ध्वनीमुद्रीत संभाषण व त्या संभाषणास पंच क्र. 1 यांनी दिलेल्या दुजोऱ्यावरुन गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे प्लॉटची मौका चैकषी करुन तहसिल कार्यालय गोरेगांव येथे चैकषी अहवाल पाठविण्याकरीता रु. 15,000/- लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु. 14,000/- लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्षविली. गै.अ.यांचेकडुन तक्रारदाराकडे असलेल्या लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्याने गै.अ.यांचे विरुध्द पुढील सापळा कार्यवाही त्याच दिवषी दिनांक 27.10.2025 रोजी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीदरम्यान घ्याव्याच्या दक्षतेबाबत पंच व तक्रारदार यांना सुचना समजावुन सांगीतल्या.

गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती रु. 14,000/- लाच रकमेची मागणी करून लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने अँथ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 30 चलनी नोटा असे एकुण रू. 15,000/- चा लाच रक्कमेचा लिफाफा आमचे सुचनेवरुन अधिनस्त अंमलदार यांनी ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन त्यापैकी रु. 500/- दराचे 02 चलनी नोटा वेगळया करुन एका लिफाफ्यात ठेवुन ट्रप सुटकेस मध्ये सुरक्षीत ठेवुन दिल्या व उर्वरीत रु. 500/- दराच्या 28 चलनी नोटा रु. 14,000/- पंच क्र. 2 यांचेकडे दिले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र.2 यांनी त्या नोटा तक्रारदार यांचे फुलपँटचे समोरील उजवे खिषात ठेवुन दिल्या.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन अधिनस्त अंमलदार यांनी सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन

डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधुन लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान वापरण्यात आलेले मेमंरी कार्ड बाहेर काढुन त्यांचे मुळ आवरणाममध्ये ठेवुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षीत ठेवुन दिले व प्लॉस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. MMC16A0SMSOC-TO XAHC 2411 असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. त्यानंतर वेळ 15.43 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन दिले. वेळ 15.43 वा. ते 16.01 वा. दरम्यान तक्रारदार यांचे गोरेगांव येथील व्ही.बी.लॉन मध्ये पंच क्र 1 यांचे समक्ष करण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीदरम्यान तक्रारदार व गैरअर्जदार यांचेत झालेले संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 251027_1543.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले.

सापळा कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तक्रारदार व गै.अ. यांच्यातील रेकॉर्ड झालेले ध्वनीमुद्रीत संभाषण व त्या संभाषणास पंच क्र. 1 यांनी दिलेल्या दुजोऱ्यावरुन गै.अ. यांनी तक्रारदार यांना एक मिनिट में आता हु बाबा को लेके असे म्हणुन लाच रक्कम न स्विकारता तिथुन निघुन गेले व त्यानंतर गै.अ. हे बाबा नावाच्या ईसमास घेवुन लॉनवर पुन्हा तक्रारदार यांचेकडे आले नसल्याने आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी तक्रारदाराचे फुलपँटच्या समोरील उजव्या खिषात ठेवुन असलेली लाच रक्कम रु. 14,000/- बाहेर काढुन एका वेगळया लिफाफ्यात ठेवुन त्यावर दोन्ही पंच व आमचे स्वाक्षरीने सिलबंद करुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिला.

त्यानंतर तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष ते कौटुंबिक कार्यक्रमाकरीता कुटुंबासह बाहेर गावी जात असल्याने गै.अ. यांचे विरुध्दची सापळा कार्यवाही एक दोन दिवसा नंतर करण्याची विनंती केल्याने तक्रारदार हे गावावरुन परत आल्यावर किंवा त्यादरम्यानच्या कालावधीत गै.अ. यांचा तक्रारदार यांना फोन आल्यास गै.अ.यांचे विरुध्दची सापळा कार्यवाही करण्याचे ठरवुन पंचांना हजर ठेवले. सदर कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 28.10.2025 रोजी तक्रारदार यांचा फोन येवु शकतो म्हणुन दोन्ही पंच व सापळा पथकासह कार्यालयात हजर राहीलो परंतु तक्रारदार यांचा आम्हास त्यांचे तक्रारीसंबंधाने फोन आला नाही. दरम्यानचे कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर पथकाने श्री सुदाम लक्ष्मणराव रोकडे, पद- सहायक निबंधक सहकारी संस्था (प्रषासन), कार्यालय - जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था गोंदिया, 4 था माळा, प्रषासकीय इमारत, जयस्तंभ चैक, गोंदिया यांचेविरुध्द सापळा कारवाई केली असल्याने त्यांना मदत करुन पुढील तपास स्वतःकडे घेण्यास मा. पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुर यांनी आम्हास आदेषित केल्याने आमचेकडील सुरु असलेल्या कार्यवाहीतील दोन्ही पंचांना गोपनीयता बाळगण्याचे सुचना देवुन दिनांक 29.10.2025 रोजी सकाळी 10.00 वा. या कार्यालयात हजर येण्यास सांगुन त्यांना घरी जाणेस रवाना केले व ला.प्र.वि नागपूर चे सापळा पथकास त्यांनी केलेल्या सापळा कारवाईमध्ये मदत केली. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र.2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

दिनांक 31.10.2025 रोजी दोन्ही पंच व सापळा पथकासह कार्यालयात हजर राहुन कार्यालयीन कामे करीत असतांना तक्रारदार यांनी कार्यालयात हजर येवुन दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की, त्यांनी त्यांचेस्तरावर गै.अ. यांचेबाबत माहिती काढली असता गै.अ. हे दिनांक 28.10.2025 पासुन कार्यालयात हजर आले नसुन रजेवर गेले आहेत अषी माहिती मिळाल्याचे सांगीतले. तक्रारदार यांनी दिलेल्या माहितीवरुन गै.अ. हे रजेवर असल्याने व दिनांक 01.11.2025, दिनांक 02.11.2025 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दिनांक 03.11.2025 रोजी कार्यालयात हजर येवु शकतात म्हणुन तक्रारदार यांना गै.अ. हे दिनांक 03.11.2025 रोजी कार्यालयात हजर आल्यास आम्हास अवगत करण्याबाबत सुचना देवुन त्यांना त्यांचे गावी जाण्यास रवाना केले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 3 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 3.11.2025 रोजी दोन्ही पंच व सापळा पथकासह कार्यालयात हजर राहुन तक्रारदार यांचे फोनची वाट पाहीली परंतु कार्यालयीन वेळ संपुन सुध्दा तक्रारदार यांचा आम्हास फोन न आल्याने गोपनिय माहिती घेतली असता गै.अ. हे कार्यालयात आज रोजी हजर आले नाहीत अषी माहिती मिळाल्याने दोन्ही पंच व सापळा पथक यांना सदर कार्यवाही बाबत गोपनीयता बाळगण्याचे सुचना देवुन दिनांक 04.11.2025 रोजी सकाळी 10.00 वा. या कार्यालयात हजर येण्यास सांगुन त्यांना घरी जाणेस रवाना केले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 4 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 04.11.2025 रोजी दोन्ही पंच व सापळा पथकासह कार्यालयात हजर राहुन कार्यालयीन कामे करीता असतांना वेळ 11.00 वा सुमारास तक्रारदार श्री मेघनाथ पुनाराम लांजेवार यांनी कार्यालयात हजर येवुन दोन्ही पंचासमक्ष गै.अ. डहाट, ग्राम महसुल अधिकारी यांनी काल दिनांक 03.11.2025 रोजी रात्री 09.00 वा सुमारास त्यांचे व माझे ओळखीचे असलेले नामे सुधिर येडे रा. गोरेगाव यांना माझेकडे पाठवुन मी लांजेवारजीचा काम करुन दिला आहे. त्यांचा प्लाॅटचा मौका चैकषी अहवाल तयार करुन दिला असुन लवकरच तहसील कार्यालय येथे पाठवुन देतो, माझ्या कडुन काही चुक झाली असल्यास मला माफ करायला सांगा त्यांचे पाय पकडतो, त्यांना समजवा असे सांगीतले. त्यावरुन गै.अ. डहाट यांना माझ्यावर संषय आला असुन ते आता माझे काम करुन देण्याकरीता माझे कडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत असे सांगुण आपण त्यांचेविरुध्द पुढील कार्यवाही करावी अषी दोन्ही पंचासमक्ष विनंती केली. त्यावरुन दोन्ही पंच व सापळा पथकासह गोरेगाव साझा क्र. 8 गोरेगाव येथे जावुन गै.अ. यांना त्यांचे कार्यालयातुन ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरवुन तक्रारदार यांना त्यांचे स्वगावी जाण्यास रवाना केले.

त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह शासकीय तसेच खाजगी वाहनाने सापळा कार्यवाही साठी लागणारे सर्व साहीत्य घेवुन गै.अ. यांचविरुध्दची पुढील कार्यवाही करण्याकरीता त्यांचे साझा क्र. 8 गोरेगाव कार्यालय येथे गेलो असता तिथे गै.अ हे हजर मिळुन आले नाही व ते दिनांक 28.10.2025 पासुन कार्यालयात आले नसल्याबाबत माहिती मिळाल्याने त्यांचा शोध घेण्याकरीता आमचे अधिनस्त अंमलदार यांचे वेगवेगळे पथक तयार करुन त्यांना गै.अ. यांचा गोंदिया परिसरात शोध घेवुन मिळुन आल्यास त्यांना ताब्यात घेवुन आमचे समक्ष हजर करण्याच्या सुचना देवुन

रवाना केले. आम्ही देखिल उर्वरीत सापळा पथकासह गै.अ. यांचा गोरेगाव परिसरात शोध घेतला असता ते मिळुन न आल्याने कार्यालयात परत येवुन हजर होतो. त्यादरम्यान 14.30 वा सुमारास स.फौ. चंद्रकांत करपे व नापोषि अषोक कापसे यांनी गै.अ.यांना आमचे समक्ष हजर करुन त्यांना मरार टोली बसस्थानकाच्या समोरुन ताब्यात घेतल्याचे सांगीतले. त्यावरुन आम्ही त्यांना त्यांचे नाव गाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अरविंदकुमार युवराज डहाट वय-43 वर्ष, पद- ग्राम महसुल अधिकारी गोरेगाव साझा क्र. 8 तहसिल कार्यालय गोरेगाव जिल्हा गोंदिया रा. कुंभारे नगर, नाना चैक समोर गोंदिया तालुका जिल्हा गोंदिया असे सांगीतले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 5 मध्ये घेण्यात आल्या आहेत.

गै.अ. श्री अरविंदकुमार युवराज डहाट, ग्राम महसुल अधिकारी साझा क्र. 8 गोरेगाव यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन स्वताःचे लाभाकरीता तक्रारदार यांचेकडे त्यांचे गोरेगांव येथील गट क्र. 1004/4 मध्ये असलेल्या पडीत जमीन पैकी 305.50 चै.मि.जागा अकृषीक विकासात्मक परवानगी मिळण्याकरीता मौका चैकषी करुन तहसिल कार्यालय गोरेगाव येथे चैकषी अहवाल पाठविण्याकरीता रु. 15,000/- पंचासमक्ष लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु. 14,000/- लाचेची मागणी करुन ति लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे. तरी, गै.अ. लोकसेवक श्री अरविंदकुमार युवराज डहाट वय-43 वर्ष, पद- ग्राम महसुल अधिकारी गोरेगाव साझा क्र. 8 गोरेगाव जिल्हा गोंदिया रा. कुंभारे नगर, नाना चैक समोर गोंदिया तालुका जिल्हा गोंदिया, यांचे कृत्य भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 (संषोधन अधिनीयम 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा होत असल्याने माझी शासनातर्फे त्यांचे विरूध्द कायदेषीर फिर्याद आहे.

(उमाकांत उगले)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गोंदिया

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Rameshwar Jairam Piparewar (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):
or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Rameshwar Jairam Piparewar

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): 8220

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1982 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**